**<u>मार्गदर्शक सूचना</u>**

जा.क्र./विप्र-७/डॉ. बा.आं.कृ.स्वा.यो./मासु/१८-१९/ /१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
दिनांक :- जुले, २०१८

**प्रति,**

**१) मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद ---------( सर्व )**
**२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद ---------( सर्व )**
**३) कृषि विकास अधिकारी,**
**जिल्हा परिषद ---------( सर्व )**

**विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना सन २०१८-१९ मध्ये राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ :-** १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र-विघयो-२०१६/प्र.क्र.१७६/४अे, दि. ५ जानेवारी,२०१७
२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.सुसिंयो-२११७/प्र.क्र.१४१/१७ /४अे, दि.२ ऑगस्ट,२०१७
३) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -२११७/प्र.क्र.१४१/३ अे, दि.२१, जुन,२०१८
४) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१२५/३अे, दि. १७ जुलै, २०१८
५) राअसुअ मासु जाक्र कृआ/विप्र-१/प्रक्र.१/२२१/१८ दि.१५/५/२०१८

अनुसुचित जाती/नवबोध्द शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अशा शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली अनुसुचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) बदललेल्या परिस्थीतीत शेतक-यांची आवश्यकता विचारात घेता सदर योजना सुधारित करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने संदर्भीय दि. ५ जानेवारी, २०१७ चे शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने रु. २३६५९.६४ लाख निधी जिल्हास्तरावर उपलब्ध करुन दिला आहे. चालू वर्षासाठी सदर निधीच्या मर्यादेत योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करुन योजनेंतर्गत कार्यक्रमाच्या आमंलबजावणीस शासनाने उपरोक्त संदर्भिय दि. १७/७/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. शासन निर्णयाच्या प्रति सर्व संबंधीतांना पृष्ठांकीत करण्यात आल्या आहेत, तसेच, शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरही (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०७१७१७०६४५६२०१ असा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०१८-१९ मध्ये राबविण्यासाठी शासन निर्णयातील विवरणपत्रात जिल्हानिहाय देण्यात आलेल्या निधीच्या तपशीलानुसार योजना राबविण्यासाठी सदर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करावी. मंजूर तरतुदीचे वितरण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडुन संबंधीत जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर निधी जिल्हाधिकारी यांचेकडुन तात्काळ प्राप्त करुन घेवून पुर्णतः खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.
सोबत : वरीलप्रमाणे

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत - माहितीस्तव.**

(१) मा. अपर मुख्य सचिव, (कृषी व पणन) कृषि व पदुम विभाग , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(२) मा. सचिव (सामाजिक न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
(३) मा. आयुक्त, समाज कल्याण, पुणे, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१
(४) विभागीय कृषि सहसंचालक, --------------------------------- (सर्व)
(५) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,------------------------------------------ (सर्व)

## सन २०१८-१९ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

### मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :** अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) सन १९८२-८३ पासून सन २०१६-१७ पर्यंत राबविण्यात येत होती. सदर योजना दिर्घकालावधीपासुन राबविण्यात येत असल्याने कृषि व पदुम विभागाच्या दि. २४/२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. १९/४/२०१६ च्या अहवालावरील कृषि आयुक्तालयाच्या दि. २७/४/२०१६ च्या शिफारसींनुसार अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-यांसाठी सन १९८२-८३ पासुन राबविण्यात येत असलेली विशेष घटक योजना व मा. मंत्री (वित्त) यांनी घोषीत केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थीतीची गरज विचारात घेवून जमिनीतील ओलावा टिकवुन ठेवण्याच्या दृष्टीकोनातून सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना बदललेल्या निकषांनुसार सन २०१६-१७ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात पुढील प्रमाणे राबविण्यात येईल.

**१.** सदर योजनेमध्ये सन २०१८-१९ या वर्षात खालील घटकासाठी त्यापुढे नमुद रकमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील.

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २५००००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५००००/- |
| ३ | इनवेल बोअरींग | २००००/- |
| ४ | पंप संच | २००००/- (१० अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे विद्युत पंप संच करीता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार १०० टक्के अनुदान देय राहिल.) |
| ५ | वीज जोडणी आकार | १००००/- |
| ६ | शेततळयांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | १०००००/- |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच<br>अ. ठिबक सिंचन<br>ब. तुषार सिंचन | <br>५००००/-<br>२५०००/- |

**२.** सदर योजनेंतर्गत वरील ७ बाबी असुन लाभ पॅकेज स्वरुपात दयावयाचा आहे. खालील तीन पॅकेजमधील एकाच पॅकेजचा लाभ लाभार्थीस अनुज्ञेय राहील. विशेष घटक योजनेंतर्गत अथवा शासनाच्या कोणत्याही योजनेतून ज्या शेतक-यांनी यापुर्वी नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा लाभ घेतला असेल अशा लाभार्थ्यांव्यतिरिक्त इतर सर्व लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण यापैकी एक घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देता येईल. त्याचप्रमाणे नवीन विहीर अथवा जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा यापुर्वी लाभ घेतलेल्या शेतक-यांना पंपसंच, वीजजोडणी आकार व सुक्ष्म सिंचन संच या घटकांचा लाभ अनुज्ञेय राहील.

सदर योजनेंतर्गत नवीन विहिर खोदणेसह अन्य सर्व बाबींची एकत्रितपणे अंमलबजावणी करणा-या लाभार्थ्यांना कमाल दोन वर्षाचा कालावधी अनुज्ञेय राहिल.

नविन विहिर खोदण्या व्यतिरिक्त अन्य बाबींकरीता निवडलेल्या लाभार्थ्यांना चालू आर्थिक वर्षातच संबंधित बाबींची अंमलबजावणी पुर्ण करणे बंधनकारक राहिल.

### २.१ नवीन विहीर पॅकेज

नवीन विहीर, पंपसंच, वीजजोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग

**२.२ जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज**

जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच, वीजजोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग

**२.३. शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज :**

शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, पंपसंच, वीजजोडणी आकार व सुक्ष्म सिंचन संच

ज्या अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-याने ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणा-या 'मागेल त्याला शेततळे' या योजने अंतर्गत शेततळयाचे काम पुर्ण केलेले आहे त्याच शेतक-यांना या पॅकेजचा लाभ घेता येईल.

**२.४. ज्या शेतक-यांनी यापूर्वीच शासकीय योजनेतून विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतक-यांना** पंपसंच, वीजजोडणी आकार व सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी अनुदान देय राहील.

**२.५. सोलरपंपासाठी अनुदान :** जर शेतक-यास महावितरण कंपनीकडुन सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु. ३००००/-) लाभार्थी हिस्स्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

**२.६. वरील घटकांपैकी लाभार्थ्याकडे काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ घेण्यासाठी खालील आवश्यक घटकांची निवड करावी.**

१) पंपसंच, २) वीजजोडणी आकार ३) सुक्ष्म सिंचन संच (ठिबक / तुषार)

**३. लाभार्थी पात्रतेच्या अटी :**

१. लाभार्थी हा अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

२. शेतक-याकडे सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३.१. ज्या शेतक-यांना नविन विहीर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.४० हे शेतजमीन असणे आवश्यक आहे.

३.२. सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हे धारण करणारे एकत्रीत कुटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल.

३.३. ज्या शेतक-यांना नवीन विहीर व्यतिरीक्त इतर घटकांचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.२० हे शेतजमीन असणे आवश्यक आहे.

३.४. सदर योजनेंतर्गत कमाल शेतजमीनीची अट ६.०० हे आहे.

४. शेतक-याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्राबाहेरील)

५. लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

६. लाभार्थ्यांचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

७. स्वर्गीय कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनांतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतक-यांना या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यात यावा.

८. अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसावे.

९. ज्या शेतक-यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/- चे मर्यादेत आहे अशा शेतक-यांनी संबंधीत तहसिलदार यांचेकडून सन २०१७-१८ चे उत्पन्नाचा अद्यावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

**४. जिल्हा निवड समिती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा लाभ घेणेसाठी लाभार्थ्यांकडुन ऑनलाईन अर्ज घ्यावेत. प्रत्येक वर्षी लाभार्थी निवडीसाठी वृत्तपत्रामध्ये जाहीरात देवून गट विकास अधिकारी यांचेकडुन विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतील. ग्रामसभेने शिफारसीत केलेल्या शेतक-यांमधील इच्छूक शेतक-यांनी ऑनलाईन अर्ज/प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे सादर करुन प्रस्तावाची मुळ प्रत आवश्यक कागदपत्रांसह कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचेकडे जमा करावी व त्याची पोहोच घ्यावी. कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची योजनेच्या निकषांआधारे काटेकोरपणे छाननी करावी. पात्र ठरणा-या अर्जदारांची यादी त्यांनी

तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे शिफारसीसह पाठवावी. छाननीत अर्ज अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून लेखी कळवावे. अर्जदाराने उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी. तालुकास्तरावर तयार करण्यात येणा-या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास संबंधीत कृषि अधिकारी पंचायत समिती व गट विकास अधिकारी सर्वस्वी जबाबदार राहतील.

पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयास शिफारसीसह प्राप्त होणा-या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून जिल्हा स्तरावर लाभार्थ्याची निवड अंतीम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील,

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | - | अध्यक्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जि.प. | - | सदस्य |
| भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी | - | सदस्य |
| सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | - | सदस्य |
| विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) | - | सदस्य |
| कृषि विकास अधिकारी, जि. प. | - | सदस्य सचिव |

**लाभार्थी निवड करताना समितीने घ्यावयाची दक्षता-** या योजनेंतर्गत चालू वर्षी जिल्हयांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीचे समन्यायी पध्दतीने तालुका निहाय वाटप करावे. त्या करीता कृषि गणने नुसार जिल्हयातील एकूण अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतक-यांपैकी योजनेच्या निकषात पात्र असणा-या (०.२० हे ते ६.०० हे क्षेत्र धारण करणा-या) संबंधित तालुक्यातील सदर प्रवर्गाच्या शेतक-यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यांचा आर्थिक लक्षांक निश्चित करावा व सदर लक्षांकाच्या मर्यादेत संबंधित तालुक्यातील इच्छुक शेतक-यांमधुन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. कृषि गणना अहवाल कृषि विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संबंधित तालुक्याच्या आर्थिक लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा निवड समितीने लाभार्थ्यांची सोडत पध्दतीने निवड करावी. ही सोडत प्रक्रिया अर्जदारांच्या व लोक प्रतिनिधींच्या उपस्थितीत जिल्हास्तरावर तालुकानिहाय राबवावी. अशाप्रकारे , सोडतीव्दारे प्रत्येक तालुक्यातील लाभार्थ्याची निवड यादी तसेच, प्रतिक्षा यादी क्रमवारीनुसार प्रसिध्द करावी. सदर तालुकानिहाय याद्यांच्या प्रती पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या सुचना फलकावर लावावी तसेच, जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावी. लाभार्थी निवड लॉटरी पध्दतीने करताना इन कॅमेरा करावी. शासनाकडून मंजूर कार्यक्रमापैकी व प्रत्यक्षात उपलब्ध होणा-या निधीच्या मर्यादेतच जिल्हानिहाय लाभार्थी निवड करावी, जेणेकरुन प्रकरणे प्रलंबीत राहण्याचा व शासनावर भविष्यात अतिरिक्त आर्थिक बोजाचा प्रश्न निर्माण होणार नाही. जिल्ह्यास / तालुक्याकरीता प्राप्त होणा-या आर्थीक लक्षांकाच्या मर्यादेतच लाभार्थ्यांना पुर्वसंमती देण्यात यावी. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील.

योजनेंतर्गत बाबींची विहित कालावधीत अंमलबजावणी न करणा-या लाभार्थ्यांची पूर्व संमती रद्द करण्यात यावी व तद्नंतर प्रतिक्षा यादीतील क्रमवारी नुसार पात्र असणा-या पुढील लाभार्थ्याची निवड करावी. अशा प्रकारे सदर योजनेंतर्गत लाभार्थ्याची पारदर्शक पध्दतीने निवड करुन योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

## ५ अर्ज व त्यावरील कार्यपध्दती :

अ) योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर सुविधा उपलब्ध केलेल्या दिनांकापासून इच्छूकांना अर्ज करण्या करीता एक महिन्याचा कालावधी देण्यात येईल. या संकेतस्थळावर योजनेचा लाभ घेवू ईच्छिणा-या अर्जदाराने आवश्यक कागदपत्रांसह त्याचा ऑनलाईन अर्ज www.agriwell.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दाखल करावा.

ब) ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत अर्जदाराने आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसांक्षाकित छायांकित प्रतीसह कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचेकडे स्वहस्ते सादर करावा. अर्जाची लेखी पोहोच दयावी, अन्यथा अर्जदारास उणीवांच्या पुर्ततेस पुरेसा कालावधी देवून परीपुर्ण अर्ज / प्रस्ताव सादर करणेबाबात लेखी कळविण्यात यावे.

क) पंचायत समिती स्तरावर प्राप्त झालेले अर्ज कृषि अधिकारी (विघयो) यांनी क्षेत्रीय पहाणी करुन गट विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हास्तरीय निवड समितीकडे अंतिम निवडीसाठी सादर करावेत.

ड) तालुका स्तरावर पात्र अर्जदार / लाभधारक यांचेबाबत भविष्यात काही समस्या उद्भवल्यास त्यास कृषि अधिकारी व गट विकास अधिकारी हे जबाबदार राहतील.

इ) जिल्हा स्तरावर प्राप्त अर्जांची / प्रस्तावांची योजनेच्या निकषाआधारे जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी नियमित छाननी करावी. छाननीत त्रुटी आढळलेल्या अर्जाबाबत संबंधीत कृषि अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत १०

दिवसांचे आत पुर्तता करुन घ्यावी. १० दिवसात पुर्तता न झाल्यास संबंधीत लाभार्थ्यास अर्ज बाद केल्याचे लेखी कळवावे. अंतिम छाननी अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर ५ दिवसाच्या आत पूर्ण करावी.

ई) तालुक्याच्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त परिपुर्ण अर्जातून लॉटरी पध्दतीने पुढील ५ दिवसात लाभार्थी निवड करावी.

उ) निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थी योजनेचा लाभ न घेण्याची शक्यता आहे यास्तव जिल्हयाच्या आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत लाभार्थी लॉटरी पध्दतीने निवडल्यानंतर उर्वरित लाभार्थ्यांची लॉटरीच्या क्रमवारीनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. प्रतिक्षाधीन यादीवरील अर्जदारास पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांची निवड अपरीहार्य कारणास्तव रद्द झाल्यासच त्यांची प्राथम्य क्रमानुसार निवड करण्यात येईल असे स्पष्टपणे कृषि विकास अधिकारी यांनी लेखी कळवावे.

ऊ) अंतिम निवड झालेल्या लाभार्थ्यास कृषि विकास अधिकारी यांनी पंचायत समिती मार्फत निवड झाल्याचे लेखी कळवावे.

ए) वैयक्तीक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. एकूण मंजूर निधीपैकी ३ टक्के निधी अपंग लाभार्थ्याकरीता राखून ठेवावा. परंतु असे लभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेवून इतर शेतक-यांना लाभ देण्यात यावा.

ऐ) जिल्हयाच्या लक्षांकाप्रमाणे अंतिम निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मागणीनुसार **परिशिष्ठ क्र. १** प्रमाणे जिल्हयाचा घटकनिहाय तसेच लाभार्थीनिहाय प्रारुप आराखडा तयार करुन तो लाभार्थी निवड झाल्याच्या दिनांकानंतर ५ दिवसांचे आत कृषि आयुक्तालयास सादर करावा. प्रारुप आराखडा कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.

## ६. घटक अंमलबजावणी :

**६.१. नवीन विहीर** — नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणा-या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद निधीतून नवीन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच यापुर्वी शासकीय योजनेतून घेलेल्या व अर्धवट राहीलेल्या अपुर्ण विहीरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासुन ५०० फुटाचे अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरीष्ठ भू वैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धततेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. **पाणी उपलब्धतेचे वैयक्तीक दाखले उपलब्ध होत नसल्यास भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत गावासाठी / गावाच्या समुहासाठी पाणी उपलब्धतेचे दाखले प्राप्त करुन घ्यावेत.** भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येनुसार सेमीक्रिटीकल / क्रिटीकल / ओव्हर एक्सप्लॉयटेड क्षेत्रामध्ये नवीन विहीर घेण्यात येवू नये. स्थानिक व भौगोलिक परिस्थीतीनुसार शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१७ डिसेंबर, २०१२ नुसार विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने निर्धारित केलेल्या तांत्रिक निकषानुसार कामे करुन विहीत वित्तीय मर्यादेच्या आत अनुदान देय राहील.

विहीर पुर्नभरण हि बाब शेतक-याने स्वखर्चाने करण्याबाबत उद्युक्त करावे. नवीन विहीर पॅकेजचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांना इतर पॅकेजचा लाभ अनुज्ञेय रहाणार नाही. नवीन विहीरीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करुन **त्यास कृषि विकास अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घ्यावी.** अंदाजपत्रकाप्रमाणे काम भौतिक दृष्टया (व्यास व खोली) पुर्ण झाल्यास जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करावा. अंदाज पत्रकाप्रमाणे विहीत केलेल्या खोलीपेक्षा अगोदरच ०.४० हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध झाल्यास व विहीर सुरक्षीत स्थीतीत आहे याची खात्री पटल्यास लाभधारकाची लेखी संमती घेवून काम पुर्णत्वाचे दाखले निर्गमित करता येतील. अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम खर्च झाल्यास मात्र बांधकाम प्रलंबीत राहील्यास पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करु नये. कामाच्या शेवटच्या हप्त्याचे अनुदान पुर्णत्वाचा दाखला, विहीरीचे लाभार्थ्यांसह, जीपीएस लोकेशनसह फोटो व मुल्यांकन सादर केल्याशिवाय देय रहाणार नाही. **कृषि अधिकारी (पं.स.) यांचेमार्फत विहीरीचे कामाची मापन पुस्तिका नोंदविण्यात यावी.** तथापि, नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्तीच्या कामाचा वर्कलोड जास्त असल्यास गरजेनुसार कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांना मोजमाप नोंदविण्याचे अधिकार देण्यास कृषि आयुक्तालयाची हरकत नसल्याबाबत कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. विप्र-७/आउयो/विघयो/संकिर्ण/००९/२०१८, दि. ५ जानेवारी, १८ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार ज्या तालुक्यांमध्ये कामाचा वर्कलोड जास्त आहे त्या तालुक्यांमध्ये कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांनी मोजमाप नोंदविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश घेवून मोजमाप नोंदविण्याचे काम सोपविण्यात यावे. त्याचप्रमाणे विस्तार अधिका-यास सोपविलेल्या कामांची नोंद सुरुवातीपासुन शेवटपर्यंत शक्यतो एकच अधिकारी घेईल याची

कृषि विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. **नवीन विहीरीची आखणी करताना, निम्मे काम झालेलेचे व विहीर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देताना अक्षांश, रेखांश व स्थानिक चिन्हासह छायाचित्र घेवून ते नस्तीस ठेवावे.**

सोडतीव्दारे नवीन विहिर या बाबीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांना त्यांची निवड झाल्या बाबत सोडतीनंतर ७ दिवसात लेखी सूचनेव्दारे कळवावे. तद्‌नंतर लाभार्थ्याच्या प्रक्षेत्राची स्थळ पहाणी करावी व तांत्रिक व्यवहार्यता तपासणी अंती, लाभार्थ्याचे नवीन विहीर खोदावयाचे ठिकाण तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे आढळल्यास सदर बाबीचे अंदाजपत्रक मंजूर करुन संबंधित लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना पूर्वसंमत्ती देण्याची कार्यवाही सोडतीच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत करावी. त्याचप्रमाणे, स्थळपहाणी मध्ये ज्या लाभार्थ्याचे प्रस्ताव तांत्रिकदृष्टया अयोग्य आढळतील अशा लाभार्थ्यांची निवड रद्द करावी व प्रतिक्षा यादीतील पात्र असणा-या पुढील लाभार्थ्याची निवड करण्यात यावी.

नवीन विहीरीसाठी लाभार्थीची निवड केल्यानंतर दहा दिवसांत लाभार्थ्यास कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी कार्यारंभ आदेश दयावेत. तसेच कामाची आखणी (लेआऊट) करुन दयावी. निवड होवून कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत विहीरीचे काम सुरु करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील. कार्यारंभ आदेश देवूनही विहीरीचे काम ३० दिवसांत सबळ कारणाशिवाय सुरु न केलेल्या लाभार्थ्यांना लेखी कळवुन काम रद्द करावे. निवड रद्द केलेबाबत वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देण्यात यावी व प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना संधी देण्यात यावी. तसेच विहीत केलेल्या मुदतीत काम पुर्ण करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील. विहीत कालावधी संपल्यानंतर अपुर्ण रहाणा-या कामासाठी कोणत्याही परिस्थीतीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची लेखी सुचना कृषि विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांना दयावी. **सन २०१७-१८ मधील नवीन सिंचन विहीरीचे काम अपुर्ण राहील्यास अशा कामांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रकरणनिहाय आढावा घेवून सबळ कारण असल्यासच मुदतवाढीस मान्यता दयावी. सदर मुदतवाढ देताना आवश्यकतेनुसार विहीरीसोबतच्या पॅकेजचा (पंपसंच, वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच) लाभ पुढील आर्थिक वर्षात देण्यासही मुदतवाढ देण्यात यावी.** नवीन विहीरीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी एक आठवडयाच्या आत विहीरीची आखणी करुन दयावी. कृषि अधिकारी पंचायत समिती यांनी दर १५ दिवसांनी विहीरीच्या कामाचा आढावा घेवून कामे विहीत कालावधीत पुर्ण करुन घ्यावीत व केलेल्या कामाचे अनुदान कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचे अहवालानुसार लाभार्थ्याचे आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी **किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती** यांनी इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे जमा करावे. लाभार्थ्याने विहीरीच्या कामाच्या दरम्यान मजूरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. याची संपुर्ण जबाबदारी लाभार्थ्याची राहील. नविन विहरीचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्याचे ७/१२ वर विहरीची नोंद घेण्याची जबाबदारी कृषि अधिकारी (पं.स.) यांची राहिल.

**६.२. जुनी विहिर दुरुस्ती :** सोडतीव्दारे जुनी विहिर दुरुस्ती या बाबीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांना त्यांची निवड झाल्या बाबत सोडतीनंतर ७ दिवसात लेखी सूचनेव्दारे कळवावे. तद्‌नंतर लाभार्थ्याच्या प्रक्षेत्राची स्थळ पहाणी करावी व तांत्रिक व्यवहार्यता तपासणी अंती, लाभार्थ्याच्या जुन्या विहिर दुरुस्तीचे प्रस्ताव तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे आढळल्यास सदर बाबीचे अंदाजपत्रक मंजूर करुन संबंधित लाभार्थ्याच्या प्रस्तावांना पूर्वसंमत्ती देण्याची कार्यवाही सोडतीच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत करावी. त्याचप्रमाणे, स्थळपहाणी मध्ये ज्या लाभार्थ्याचे प्रस्ताव तांत्रिकदृष्टया अयोग्य आढळतील अशा लाभार्थ्यांची निवड रद्द करावी व प्रतिक्षा यादीतील पात्र असणा-या पुढील लाभार्थ्याची निवड करण्यात यावी. जुनी विहीरी दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणा-या अनुसूचित जातीतील शेतक-यांच्या ७/१२ वर विहीरीची नोंद असावी. कामाच्या अंदाजपत्रकास कृषि विकास अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दयावी. झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन विहीत अनुदान मर्यादेत कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचे अहवालानुसार अनुदान लाभार्थ्याचे आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे जमा करावे. विहीरीच्या कामास अंदाजपत्रकापेक्षा अधिक रक्कम लागल्यास लाभार्थीने स्वतः उभी करावयाची आहे. जुनी विहीर दुरुस्तीचे काम वेळेत पुर्ण करण्याबाबत लाभार्थ्याकडुन बंधपत्र घेण्यात यावे तसेच कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी नियमित आढावा घेवून कामे पुर्ण करुन घ्यावीत.

योजनेंतर्गत नविन विहिर व जुनी विहिर दुरुस्ती या बाबींशिवाय अन्य बाबींसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना सोडतीनंतर ७ दिवसात पूर्व संमती देण्यात यावी व त्यांना योजनेचा लाभ चालू आर्थिक वर्षातच देण्यात यावा.

**६.३. इनवेल बोअरींग :** नवीन विहीर / जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणा-या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास रु. २०,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करतांना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा. कृषि विकास अधिकारी यांनी, कृषि अधिकारी (विघयो), पंयाचत समिती यांनी झालेल्या कामाची मोजमापे घेऊन सादर

केलेल्या खर्चाचे अहवालानुसार विहीत अनुदान मर्यादेत अनुदान लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी **किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती** यांनी इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे जमा करावे.

**६.४. पंपसंच-** १० अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे विद्युत पंप संच करीता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार १०० ट्क्के अनुदान (रु.२००००/-पर्यंत) देय राहिल.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान सन २०१८-१९ मार्गदर्शक सूचना राअसुअ मासु जाक्र कृआ/विप्र-१/प्रक्र.१/२२१/१८ दि.१५/५/२०१८, दि. १५/५/२०१८ नुसार पंपसंच या बाबीच्या खरेदीकरीता देण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतील पंपसंचाचा लाभ देण्यासाठी करण्यात यावा.

**६.४.१** पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना पंपसंच खरेदीकरीता कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी पुर्वसंमती दयावी. सदर लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा संबंधीत शेतक-यांची पुर्वसंमती रद्द करण्यात यावी.

**६.४.२** केंद्र व राज्य शासनाच्या अधीकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाचे रितसर तपासणी (testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (standards) असल्याचे प्रमाणित केले असेल त्याच पंपसंचाची पुर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतक-याने खरेदी करावयाची आहे.

**६.४.३** पुर्वसंमती मिळालेल्या लाभार्थ्याने बाजारातील अधीकृत विक्रेत्यांकडुन पंपसंचाची खरेदी करावी तसेच स्वतःच्या आधार संलग्न बँक खात्यातून इलेक्ट्रानिक पध्दतीने / धनादेश / धनाकर्ष व्दारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

**६.४.४** पंपसंचाची खरेदी केल्यानंतर त्याबाबतचे देयक (invoice) लाभार्थ्यांने कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांचेकडे सादर करावे.

**६.४.५** लाभार्थ्याने खरेदी केलेल्या पंपसंचाचे देयक प्राप्त झाल्यानंतर कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी मोका तपासणी करुन १५ दिवसांमध्ये जीएसटी वगळुन अनुदान मागणीचा प्रस्ताव आपल्या शिफारसीसह कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद / गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे सादर करावा.

**६.४.६.** कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचेकडुन प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत संबंधीत लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी अनुदान जमा करावे.

**६.५. वीज जोडणी आकार** : नवीन विहीर पॅकेज / जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज / शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणा-या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांचेकडे सादर करावी. कृषि अधिकारी (विघयो), पंयाचत समिती यांनी सदर पावतीनुसार विद्युत वितरण कंपनीकडे खातरजमा करुन लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी **किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती** यांना इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे विहीत अनुदान मर्यादेत अनुदान वर्ग करण्यासाठी प्रस्तावित करावे. योजनांतर्गत वीज जोडणीची मागणी करणा-या लाभार्थ्यांना प्राथम्याने वीजजोडणी देणेबाबत महावितरण कार्यालयाशी पाठपुरावा करावा. विद्युत विकास योजने अंतर्गत वीजजोडणीच्या कामासाठी निधी उपलब्ध असल्यास सदर निधी जिल्हास्तरीय समितीकडुन प्राप्त करुन घेवून सदर योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना वीजजोडणीच्या कामासाठी वापरल्यास कमीत कमी कालावधीत वीजजोडणी मिळेल हि बाब कृषि विकास अधिकारी यांनी महावितरणचे अधिका-यांचे निदर्शनास आणुन दयावी. कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हास्तरीय समन्वय बैठकीत निवड लाभार्थीना विद्युत कनेक्शन मिळणेबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

**६.६. शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण :** ज्या शेतक-यास ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणा-या मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या व डॉ. बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजनेच्या अटी व शर्ती पुर्ण करणा-या अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-याने शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकाची मागणी केल्यास, कृषि अधिकारी (विघयो), पंयाचत समिती यांनी क्षेत्रीय पहाणी करुन काम पुर्ण झालेल्या शेततळयांच्या आकारमानानुसार आवश्यक असणा-या प्लॅस्टीक कागदाचे क्षेत्रफळ व त्याबाबतचे अंदाजपत्रक निश्चित करुन घ्यावे. अंदाजपत्रक निश्चित झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पुर्ण करणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील. सदर कालावधीनंतर कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी झालेल्या कामाचा अहवाल कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर केल्यानंतर १५ दिवसात अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी **/ गट विकास अधिकारी, पंचायत समिती** यांनी इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे अनुदान मर्यादेत

वर्ग करण्याची कार्यवाही करावी. अनुदानाची रक्कम वितरीत करण्यापुर्वी संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचे अस्तरीकरणाचा लाभ दिला नसल्याबाबत प्रमाणपत्र घेण्यात यावे. प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी कृषि अधिकारी (पं.स.) यांची राहील.

शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरणासाठीचे परिमाण राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार देय राहील. प्लॅस्टीक फिल्म ५०० मायक्रॉन रिइनफोर्सड एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म साठी अनुदान राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच आर्थिक मापदंडानुसार प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १,००,०००/- यापेक्षा जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

**६.७. सुक्ष्म सिंचन संच : :** या योजनेच्या लाभार्थ्यांना सुक्ष्म सिंचन संचाकरीता मंजूर मापदंडानुसार येणा-या खर्चापैकी कमाल ५५ टक्के अनुदान प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेतून देण्यात येईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या तरतुदीतून ३५ टक्के अनुदान (कमाल रुपये-५००००/- मर्यादेपर्यंत) पुढीलप्रमाणे देण्यात येईल.

६.७.१) लाभार्थ्याचा ठिबक सिंचन संच बसविण्याचा मंजूर मापदंडानुसार एकूण खर्च रु. १५८७३०/- वा त्यापेक्षा कमी झाल्यास लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजनांच्या माध्यमातून ९० टक्के अनुदान अदा करण्यात येईल.

६.७.२) लाभार्थ्याचा ठिबक सिंचन संच बसविण्याचा मंजूर मापदंडानुसार एकूण खर्च रु. १५८७३०/- पेक्षा जास्त झाल्यास लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेतून मापदंडानुसार ५५ टक्के अनुदान देण्यात येईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या तरतुदीतून रु. ५००००/- अनुदान देण्यात येईल.

६.७.३) लाभार्थ्याचा तुषार सिंचन संच बसविण्याचा मंजूर मापदंडानुसार एकूण खर्च रु.७९३६५/- वा त्यापेक्षा कमी झाल्यास लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजनांच्या माध्यमातून ९० टक्के अनुदान अदा करण्यात येईल.

६.७.४) लाभार्थ्याचा तुषार सिंचन संच बसविण्याचा मंजूर मापदंडानुसार एकूण खर्च रु. ७९३६५/- पेक्षा जास्त झाल्यास लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेतून मापदंडानुसार ५५ टक्के अनुदान देण्यात येईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या तरतुदीतून रु. २५०००/- अनुदान देण्यात येईल.

सदर योजनेची तसेच योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी ९० टक्के अनुदान उपलब्ध असल्याचे जिल्हास्तरावरुन व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. त्याकरीता जिल्हा कृषि विकास अधिका-यांनी जिल्हयातील प्रमुख वृत्त पत्रांमध्ये या योजनेंतर्गत शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येणा-या बाबी व त्याकरीता मिळणारे अनुदान याच्या सविस्तर तपशिलासह जाहिरात प्रसिध्द करुन योजनेंतर्गत उपलब्ध बाबींसाठी इच्छूक शेतक-यांना अर्ज करण्यास सूचित करण्यात यावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन संचाकरीता निवड झालेल्या सर्व लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेंतर्गत पुरक अनुदान उपलब्ध करुन देण्याकरीता कृषि विकास अधिका-यांनी संबंधित लाभार्थ्यांचे ई-ठिबक प्रणालीवर अर्ज भरुन घ्यावेत व सदर लाभार्थ्यांची यादी जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांना मंजूर करीता पाठवावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत ई-ठिबक प्रणालीवर अर्ज केलेल्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी प्राधान्याने मंजूरी देऊन त्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेंतर्गत अनुज्ञेय पुरक अनुदान उपलब्ध करुन द्यावे. त्याचप्रमाणे, त्यांनी पुरक अनुदान वर्ग केलेल्या लाभार्थ्यांची यादी कृषि विकास अधिका-यांना पाठवावी. जेणेकरुन सदर लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत अनुज्ञेय ठरणारी अनुदानाची रक्कम अदा करणे त्यांना शक्य होईल.

कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी संच बसविल्यानंतर १५ दिवसांत क्षेत्रीय पहाणी करुन काम पुर्ण झाल्याची खातरजमा करावी व त्यापुढील १० दिवसात अनुदान वितरणाचा प्रस्ताव कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद /गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना आपले शिफारसीसह सादर करावा.

कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद किंवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झालेपासुन १५ दिवसांत इलेक्ट्रॉनीक फंड ट्रांसफर व्दारे विहीत अनुदान मर्यादेत अनुदान लाभार्थ्याच्या आधारसंलग्न बँक खात्यात वर्ग करावे.

**७. प्रशासकीय व वित्तीय मान्यता :** सदर योजनेस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडुन जिल्हाधिकारी स्तरावर निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने त्या विभागाचा शासन निर्णय क्र. विघयो-

२०१०/प्रक्र. २६/विघयो, मंत्रालय मुंबई दि. १३ एप्रिल, २०१७ नुसार सदर योजनेस संबंधीत जिल्हाधिकारी यांची वित्तीय मान्यता घेण्यात यावी.

**८. लाभार्थ्यांची निवड रद्द करणे** : लाभार्थीच्या निवडीचे अंतीम अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. खालील कारणांमुळे जर काही लाभार्थीची निवड रद्द करणे क्रमप्राप्त असल्यास त्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.

८.१ समितीने निवड केलेला शेतकरी मयत झाल्यास.

८.२ निवड केलेल्या शेतक-याने सर्व शेतजमीन विकून तो भुमीहीन झाला असल्यास.

८.३ निवड केलेला शेतकरी शेती विकास योजना हाती घेण्यास इच्छूक नसल्यास तसेच विहीत कालमर्यादेत काम पुर्ण करण्यास टाळाटाळ करीत असल्यास.

८.४ निवड केलेल्या शेतक-याने अर्थसहाय्य घेण्यास नकार दिल्यास.

८.५ निवड केलेला शेतकरी योजनेखाली घेतलेल्या अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास.

८.६ लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळून आल्यास.

वरील परिस्थितीमुळे लाभार्थ्याची निवड रद्द झाल्यास त्याबाबत कागदोपत्री सर्व आवश्यक पुरावे ठेवून तसे लाभधारकास लेखी कळविणे संबंधीत कृषि विकास अधिकारी यांना बंधनकारक राहील.

८.७ मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी व उर्वरीत अर्थसहाय्य त्यांना देण्याबाबत निर्णय घेवून कार्यवाही करावी. अशा प्रकरणी कायदेशीर बार्बीची सर्वतोपरी पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

८.८ अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत योजनेच्या सुरवातीपासुन तालुका स्तरावर उपलब्ध असणारे सन १९८२-८३ पासुन निवड केलेले लाभार्थ्यांचे मास्टर रजिस्टर डिजीटलाईज्ड करुन जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**८.९ लाभार्थी रजिस्टर** - सदर योजनेंतर्गत लाभार्थीची नोंदवही जिल्हास्तर व पंचायत समिती स्तरावर अद्यावत ठेवण्यात यावी. पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीची किमान महिन्यातुन एकदा तपासणी करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहील. तसेच जिल्हास्तरावरील नोंदवहिची तपासणी करण्याची जबाबदारी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ कृषि विकास अधिकारी यांची राहील.

**९. प्रचार व प्रसिध्दी :** या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवांना व्हावी या दृष्टिने विभागीय स्तरावर विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा स्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी. सदर योजनेची सविस्तर माहिती पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी (वि.घ.यो.) तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्याकडे उपलब्ध ठेवावी. **योजनेसाठी अंतीमतः निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावी. तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.**

योजनेची माहिती सर्व सामान्य लोकांना व स्वयंसेवी संस्थांना होण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यांत यावी. कृषि विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी/ अधिकारी यांनी गावपातळी / तालुका स्तरावर प्रदर्शनाच्या माध्यमातूनही योजनेची माहिती देण्यात यावी.

सन २०१८-१९ मध्ये सदर योजना राबविताना कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. नवीन विहीरीचे कामाचे कार्यारंभ आदेश संपुर्ण जिल्हयामध्ये लाभार्थीना एकाच दिवशी वाटप केल्यास सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी प्रभावीपणे सर्व संबंधीतापर्यंत पोहोचेल.

**१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो २००९/प्र.क्र.८४९/विघयो-१, दि. ४/२/२०१० नुसार प्रशासकीय मान्यता देणे, पुर्नविनियोजन करणे इ. बाबत सुधारित कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील अनुसूचित जाती उपयोजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे या परिच्छेदामध्ये विधिमंळाच्या अंदाज समितीने खालीलप्रमाणे बदल करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र. विघयो-२०१०/प्रक्र. २६/विघयो, मंत्रालय मुंबई दि. १३ एप्रिल, २०१७ नुसार शासनाने मान्यता दिली आहे. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याच्या अनुसूचित जाती उपयोजनेसाठी निधी वाटपा संबंधात नियंत्रक अधिकारी राहतील. हे त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुर्नवाटप करण्यास ते सक्षम राहतील.

(i) निधीचा प्रशासकीय संकेतांक हा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत हाताळण्यात येईल. योजनेच्या संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेकडुन कॅश फ्लो मागवून घेऊन मासिक निधी विवरणपत्र तयार करावे.

(ii) जिल्हा योजनेतील राज्य तरतूद जिल्हा नियोजन विकास मंडळाकडुन करुन अर्थसंकल्पीय तरतूद वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणेला करतील. अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर त्याची नोंद घेणे, कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेस प्रशासकीय मान्यता देणे, त्यानुसार निधी वितरण आदेश काढणे व कार्यान्वयीन यंत्रणेस निधी वितरण करणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यान्वयीन यंत्रणांना निधीचे वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदर जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबधीत विभागीय आयुक्त यांनी संबधीत जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करून घेणे अनिवार्य राहील.

(iv) आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेले पुर्नविनियोजन / पुर्नवितरणाबाबत योजनानिहाय सविस्तर माहिती आर्थिक वर्ष संपताच शासनास सादर करावयाची आहे जेणेकरुन “अंतिम सुधारित तरतूद (FMG)” निश्चित करणे शक्य होईल.

अनुसूचित जाती उपयोजना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने राबविण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने या योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची वरीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती नुसार कार्यवाही करण्यात यावीत.

वरील सुचनानुसार कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांनी जिल्हास्तरीय आराखडा तयार करून त्यानुसार जिल्हा नियोजन मंडळ (डीपीसी) मध्ये आवश्यक तरतुद मंजूर करून घ्यावी. त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निधी प्रवाह (Cash Flow) सादर करुन अनुदान उपलब्ध करून घ्यावे व खर्चाची कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी कार्यालयास निधीची मागणी करून अनुदान उपलब्ध करून घेण्याची सर्व जबाबदारी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांची राहील.

**११. संकिर्ण/आकस्मिक खर्च-** सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या ३ टक्के इतका निधी संकिर्ण/आकस्मिक खर्चाच्या बाबीसाठी (उदा.जिल्हा परिषद तसेच तालुका स्तरावर संगणक घेण्यासाठी, विविध नोंदवह्या, तपासणी फ़ॉर्म, इतर स्टेशनरी तसेच तालुका, जिल्हा स्तरावर बेठकिसाठी लागणारा खर्च व इतर अनुषंगिक बाबीसाठी लागणारा खर्च) खर्च करण्यास तसेच सदर योजनेच्या अनुषंगाने शासन स्तरावर व आयुक्तालय स्तरावर झालेल्या बेठकिसाठी लागणारा खर्च जिल्ह्यांना उपलब्ध करुन दिलेल्या ३ टक्के आकस्मिक खर्चातुन चक्राकार पध्दतीने भागविण्यास उपरोक्त संदर्भीय दि.२१ जून २०१८ चे शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

**१२. तांत्रिक मान्यता :-** योजनेच्या मार्गदर्शक सूचना याच योजनेसाठी तांत्रिक मान्यता समजण्यात याव्यात.

**१३. मासिक प्रगती अहवाल:** योजनेचा मासिक प्रगती अहवाल कृषि विकास अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या **प्रपत्र १ ते २ (अ, ब, क)** मध्ये प्रत्येक महिन्याच्या **५ तारखेपर्यन्त** कृषि आयुक्तालय, संबंधीत जिल्हाधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक तसेच समाज कल्याण विभागाकडे नियमीतपणे पाठवावा. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने विभागाचा एकत्रित मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास ईमेलव्दारे (ddappscptsp@rediffmail.com) तसेच टपालाव्दारे सादर करावा.

**१४. तपासणी:** योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने पर्यवेक्षकीय अधिका-यांनी करावयाच्या घटकनिहाय तपासणीची टक्केवारी **परिशिष्ठ २** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

सदर परिशिष्ठात दर्शविलेल्या अधिका-यांनी त्याचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची क्षेत्रनिहाय समप्रमाणात **परिशिष्ठ ३ व ४** नुसार तपासणी करुन तपासणीचा अहवाल **प्रपत्र-३** मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत ईमेलव्दारे (ddappscptsp@rediffmail.com) सादर करावा.

सोबत : १) परिशिष्ठ १ ते ६, २) प्रपत्र – १ ते ३

**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**परिशिष्ठ - १**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा प्रारुप आराखडा**

**जिल्हा -------------                                        दिनांक --------------**

**निवडलेले एकूण लाभार्थी संख्या : महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----**

**सन २०१७-१८ मधील ३१ मार्च अखेर शिल्लक निधी रु.---------**

**सन २०१८-१९ मध्ये प्राप्त निधी -------------**

**सन २०१७-१८ मधील एकुण दायीत्व ----------------**

**सन २०१८-१९ मध्ये योजना राबविण्यासाठी शिल्लक निधी ------------------**

**अ) घटकनिहाय**

| अ. क्र. | घटक | लाभार्थ्याची मागणी | |
|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक |
| १ | नवीन विहीर | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | |
| ३ | इनवेल बोअरींग | | |
| ४ | पंप संच | | |
| ५ | वीज जोडणी आकार | | |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | |
| ७ | ठिबक सिंचन संच किंवा | | |
| | तुषार सिंचन संच | | |

**ब) लाभार्थीनिहाय**

| अ. क्र. | लाभार्थीचे नाव | घटक | | | | | | | | एकुण मागणी (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन विहीर | जुनी विहीर दुरुस्ती | इनवेल बोअरींग | पंपसंच | वीज जोडणी आकार | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | ठिबक सिंचन संच | तुषार सिंचन संच | |
| १ | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | |
| एकुण | | | | | | | | | | |

**लाभार्थ्याने ज्या घटकांची ऑनलाईन मागणी केलेली आहे त्या घटकांची अनुदान मर्यादा नमुद करुन लाभार्थ्यांची एकुण मागणी नमुद करावी.**

## परिशिष्ठ – २

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत अधिका-यांनी करावयाच्या तपासणीची टक्केवारी**

| अ. क्र. | तपासणी अधिकारी | घटकनिहाय टक्केवारी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन विहीर | जुनी विहीर दुरुस्ती | इनवेल बोअरींग पॅकेज | पंपसंच | वीज जोडणी आकार | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज | सुक्ष्म सिंचन संच |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | विभागीय कृषि सह संचालक (कार्यालयातील वर्ग -२ व त्या पुढील अधिकारी) | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| २ | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ३ | जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) जिल्हा परिषद | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| ४ | कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समितीस्तर | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

## परिशिष्ठ – ३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत **नवीन विहीर/ जुनी विहीर दुरुस्ती** या घटकांच्या तपासणीसाठी परिशिष्ठ

१. तपासणी अधिका-याचे नाव व पदनाम
२. तपासणी दिनांक
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
४. नवीन विहीर घेतलेल्या /जुनी विहीर दुरुस्ती करावयाच्या क्षेत्राचा सर्वे नंबर व क्षेत्र
५. नवीन विहीर /जुनी विहीर दुरुस्तीचा अंदाजपत्रकीय खर्च
६. तांत्रिक मान्यता दिनांक व रक्कम
७. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या कामाची स्थिती
८. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या पुर्ण केलेल्या कामाची अंदाजीत रक्कम
९. पैकी लाभार्थीस दिलेले अनुदान
१०. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी)
११. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक)
१२. लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान अदा केल्याचा दिनांक
१३. तपासणी अधिका-याचे अभिप्राय

तपासणी दिनांक　　　　　　　　　　तपासणी अधिका-याची स्वाक्षरी

## परिशिष्ठ – ४

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनें अंतर्गत इतर घटकांच्या तपासणीचे परिशिष्ठ**

१. तपासणी अधिका-याचे नाव व पदनाम
२. तपासणी दिनांक
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
४. लाभार्थीने मागणी केलेल्या बाबी एकूण
५. खरेदी दिनांक
६. दिलेल्या लाभाचा तपशील व रक्कम
७. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी)
८. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक)
९. लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान अदा केल्याचा दिनांक
१०. काम पुर्ण झाल्याचा दिनांक
११. तपासणी अधिका-याचे अभिप्राय

तपासणी दिनांक                                        तपासणी अधिका-याची स्वाक्षरी

**प्रपत्र – १**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०१८-१९ मधील खर्चाचा अहवाल**

**जिल्हा -----**

**अहवाल कालावधी माहे , २०१८ अखेर**

**निवडलेले एकूण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----**

**सन २०१७-१८ मधील शिल्लक निधी रु.-----**

**निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या -----**

**२०१८-१९ मध्ये प्राप्त निधी - -----**

**अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या -----**

**एकुण उपलब्ध निधी -----**

| अ. क्र. | घटक | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ |
| **१** | **नवीन विहीर** | | | | |
| **२** | **जुनी विहीर दुरुस्ती** | | | | |
| **३** | **शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण** | | | | |
| **४** | इनवेल बोअरींग | | | | |
| **५** | पंपसंच | | | | |
| **६** | वीजजोडणी आकार | | | | |
| | अ) ठिबक सिंचन संच किंवा | | | | |
| **७** | ब) तुषार सिंचन संच | | | | |
| **८** | अभिकरण शुल्क | | | | |
| **९** | आकस्मिक खर्च | | | | |
| **एकुण** | | | | | |
| **सन २०१८-१९ या वर्षात प्रत्यक्ष निवडलेले लाभार्थी** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर मागणीप्रमाणे संपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर त्यांचे मागणीप्रमाणे अपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर कोणताही लाभ न दिलेले शिल्लक लाभार्थी** | | | | | |

## प्रपत्र – २ (अ)
## नवीन सिंचन विहीरीच्या कामाच्या प्रगतीचा मासिक अहवाल

**जिल्हयाचे नांव -** **दि. ------------- ते दि. --------------**

(रक्कम रु. लाखात)

| नवीन विहीरीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश दिलेल्या विहीरींची संख्या | पैकी कामे सुरु झालेल्या विहीरींची संख्या | पुर्ण विहीरीचा तपशील | | अपुर्ण विहीरीचा तपशील | | | | झालेला एकुण खर्च | कार्यारंभ आदेश देऊनही अद्याप कामे सुरु न झालेल्या विहीरींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १०० टक्के खोदाई व बांधकाम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | पुर्ण झालेल्या विहीरी वरील खर्च | १०० टक्के खोदाई काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | ५० टक्क्यां पेक्षा जास्त काम झालेल्या विहीरींची संख्या | ५० टक्क्यां पेक्षा कमी काम झालेल्या विहीरींची संख्या | अपुर्ण विहीरी वरील णलेला खर्च | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

## प्रपत्र – २ (ब)
## जुनी विहीर दुरुस्ती कामाच्या प्रगतीचा मासिक अहवाल

**जिल्हयाचे नांव -** **दि. ------------- ते दि. --------------**

| जुनी विहीर दुरुस्तीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश दिलेल्या विहीरींची संख्या | पैकी कामे सुरु झालेल्या विहीरींची संख्या | कामाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजपत्रकाप्रमाणे १०० टक्के पुर्ण काम झालेल्या विहीरींची संख्या | अंदाजपत्रकाप्रमाणे ५० टक्के पेक्षा जास्त काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | अंदाजपत्रकाप्रमाणे काम ५० टक्के पेक्षा कमी काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | झालेला एकुण खर्च (रु. लाखात) | कार्यारंभ आदेश देऊनही अद्याप कामे सुरु न झालेल्या विहीरींची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

## प्रपत्र – २ (क)
## शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरणाच्या कामाचा प्रगती तपशील

**जिल्हयाचे नांव -** **दि. ------------- ते दि. --------------**

| अस्तरीकरणासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश संख्या | पैकी कामे पुर्ण संख्या | झालेला एकुण खर्च (रु. लाखात) | कार्यारंभ आदेश देवनही कामे सुरु न झालेली संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## प्रपत्र – ३

**सन २०१८-१९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत लाभार्थी तपासणीचा मासीक अहवाल**

**विभाग ----------जिल्हा -----------** **माहे ----------- अखेर**

| अ. क्र. | घटक | तपासणी केलेल्या लाभार्थीचा तपशील | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ दिलेले एकुण लाभार्थी | चालु महिन्यात तपासलेले लाभार्थी | मागील महिन्यापर्यंत तपासलेले लाभार्थी | एकुण तपासलेले लाभार्थी | तपासणी टक्केवारी | |
| **कृषि विकास अधिकारी** | | | | | | | |
| १ | नवीन विहीर | | | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | |
| ३ | इनवेल बोअरींग | | | | | | |
| ४ | पंप संच | | | | | | |
| ५ | वीज जोडणी आकार | | | | | | |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | | | |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | | | | | | |
| **एकुण** | | | | | | | |
| **कृषि अधिकारी (विघयो)** | | | | | | | |
| १ | नवीन विहीर | | | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | |
| ३ | इनवेल बोअरींग | | | | | | |
| ४ | पंप संच | | | | | | |
| ५ | वीज जोडणी आकार | | | | | | |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | | | |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | | | | | | |
| **एकुण** | | | | | | | |
| **कृषि विकास अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) एकुण** | | | | | | | |

**जिल्हा कृषि अधिकारी (विघयो)** **कृषि विकास अधिकारी**